**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बृहन्मुंबई मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ३३(१९) च्या तरतूदीबाबत शुध्दीपत्रक.....

# महाराष्ट्र शासन
## नगर विकास विभाग
**क्रमांक :- टिपीबी-४३१९/२२०/प्र.क्र.१४०/२०१९/नवि-११**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**दिनांक :- २४ सप्टेंबर, २०२०**

**शासन निर्णय** : सोबतचे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( निर्मलकुमार चौधरी )**
**अवर सचिव महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**
(१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
(२) मा.मंत्री ( नगर विकास ) यांचे खाजगी सचिव.

**प्रति,**
(१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
(२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(३) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, इन्साहटमेंट, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.
(४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाचे साधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी २५ प्रती १)नगर विकास विभाग नवि-११, मंत्रालय, मुंबई २) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई ३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व ४) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(५) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, यांना विनंती करण्यात येते की, सोबतचे शुध्दीपत्रक विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावे.
(६) निवड नस्ती (नवि-११)

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

---

**Regarding Corrigendum to provisions of Regulation 33 (19) of Sanctioned Development Control & Promotion Regulations-2034 of Greater Mumbai.**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Date :- 24th September 2020**

## CORRIGENDUM

**No. TPB-4319/220/CR-140/2019/UD-11**

Whereas, in exercise of the powers conferred by sub Section (1) of Section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the Said Act"), the State Government vide Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08/05/2018 (hereinafter referred to as "the said Notification") has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification. And whereas, Government has issued corrigendum of even number dt. 22nd June, 2018 and thereafter issued a Corrigendum and Addendum of even number dt. 29th June, 2018 to the said Notification, which is published in Government Gazette dt. 30th June, 2018;

And whereas, the Government vide Notification dt. 21/09/2018 has sanctioned EP -1 to EP-168 ( Excluding certain EP and provisions which were kept in abeyance ) in the Development Control and Promotion Regulations -2034, which were excluded as substantial modifications;

And whereas, the Government has issued Corrigendum on dated 12/11/2018 and on dated 11/09/2019 in respect of Development Control and Promotion Regulations-2034 wherein some typographical errors and mistakes regarding Regulation 33(19) were rectified;

And whereas, the Chief Engineer (Development Plan) Municipal Corporation of Greater Mumbai vide his letter dated 20/07/2020 has requested to issue clarification as to whether the gross plot area excluding areas to be handed over to MCGM/ Appropriate Authority in lieu of Reservations / existing amenity in the D.P. should be considered for allowing additional FSI under Regulation 33(19) i.e. including proposed D.P. road/ sanctioned RL as stated in the regulation without considering the note below Table in regulation 33(19) of DCPR-2034.

And whereas, the Government has examined the aforesaid issue and it is revealed that in sub regulation (1) of Regulation 33(19) the intent and spirit is not to deduct the area of proposed D.P. road / sanctioned R.L. under MMC Act and parking reservation. Thus, it is observed that there is an error and mistakes in proviso below sub regulation (5) and in the note below Table of regulation 33(19) and therefore it is essential to rectify the aforesaid error and mistake Regulation33(19) for its proper interpretation, clarify and co-relate the said provision, Government feels it necessary to issue a Corrigendum for the same;

Now, therefore, this Corrigendum is issued to rectify error and mistake in Proviso below sub-regulation (5) & Note below Table of Regulation 33(19) in sanctioned Development Control and Promotion Regulations-2034 as mentioned in Schedule appended hereto;

Copy of this Corrigendum is made available for the inspection of the public in the following offices during office hours on all working days for the period of thirty days.

(1) Chief Engineer (Development Plan), Municipal Corporation of Greater Mumbai, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, 'E' Block, ENSA Hutment, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

This Corrigendum is also available on the Govt. of Maharashtra website: www.maharashtra.gov.in **(Acts& Ruls)**

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

**( Nirmalkumar Chaudhari )**
**Under Secretary to Government.**

# SCHEDULE

**Appended to the Urban Development Departments Corrigendum No. TPB-4319/220/ CR-140/2019/UD-11, Dt. 24th September 2020.**

## CORRIGENDUM

| Sr. No. | Regulation | Instead of | Read |
|---|---|---|---|
| 1 | Regulation 33(19) proviso below sub Regulation (5) | Designation | Existing amenity |
| 2 | Note below Table in Regulation 33(19) | **Note** : On the plot area excluding area to be handed over to MCGM/Appropriate Authority in lieu of Reservation/ Existing amenity in the DP/ proposed DP roads/prescribed RL under MMC Act and Parking Reservation. | **Note** : On the plot area excluding area to be handed over to MCGM/Appropriate Authority in lieu of Reservation/ Existing amenity in the DP **except affected** by proposed DP roads/sanctioned RL under MMC Act and Parking Reservation. |

URBAN DEVELOPMENT DEPTT MANTRALAYA, MUMBAI-32

**( Nirmalkumar Chaudhari )**
**Under Secretary to Government.**

**<u>महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६</u>**
बृहन्मुंबई मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ३३ (१९) च्या तरतूदीबाबत शुध्दीपत्रक ...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२,**
**दिनांक :- २४ सप्टेंबर, २०२०.**

## <u>शुध्दीपत्रक</u>

**क्रमांक :- टिपीबी-४३१९/२२०/प्र.क्र.१४०/२०१९/नवि-११**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करणेत आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाने अधिसूचना क्र.टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि.८/०५/२०१८ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजूरी दिली आहे. आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दि.२२ जून २०१८ रोजी व त्यानंतर समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले आहे, जे महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने दि. २१/०९/२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रारुप विकास योजना-२०३४ ला भागश: मंजूरी देताना मंजूरीतून वगळलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली -२०३४ मधील सारभूत स्वरुपाचे फेरबदल ईपी-१ते ईपी-१६८ ला (ठराविक ईपी व निर्णयार्थ प्रलंबित ठेवलेल्या ठराविक तरतुदी वगळून) मंजूरी प्रदान केली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ बाबत दि.१२/११/२०१८ व दि. ११/०९/२०१९ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित केले असून त्यामध्ये विनियम ३३(१९) च्या अनुषंगाने टंकलेखनाच्या त्रुटी व चूका सुधारित झाल्या आहेत;

आणि ज्याअर्थी मुख्य अभियंता (विकास योजना), बृहनमुंबई महानगर पालिका यांनी दि.२०/०७/२०२० रोजीचे पत्रान्वये विनियम ३३(१९) अन्वये अतिरिक्त चटई क्षेत्र अनुज्ञेय करताना भूभागाचे एकूण क्षेत्रातून विकास योजनेतील आरक्षण / विद्यमान सुविधांचे बृहन्मुंबई महानगरपालिका / समुचित प्राधिकरणास हस्तांतरीत करावयाचे क्षेत्र वगळून i.e. विनियम ३३(१९) खालील नोट विचारात न घेता विनियमात नमूद केल्यानुसार प्रस्तावित विकास योजना रस्ता/ रस्त्याची मंजूर नियमित रेषा (आर.एल.) सह भूभागाचे क्षेत्र विचारात घ्यावयाचे यासंबंधी विनियम ३३(१९) बाबत स्पष्टीकरण देणेबाबत महापालिकेने शासनास विनंती केली आहे.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

आणि ज्याअर्थी, विनियम ३३(१९) चे उपविनियम १ मधील तरतूदीचा खरा हेतू व इरादा हा प्रस्तावित विकास योजना रस्ता /एम.एम.सी. अॅक्ट अंतर्गत मंजूर रस्त्याची नियमित रेषा (आर.एल.) आणि वाहनतळ आरक्षण याचे क्षेत्र वजा न करणे असा असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे विनियम ३३(१९) मधील उपनियम (५) खालील परंतुकामध्ये तसेच सदर विनियमातील तक्त्याखालील टिप मध्ये काही त्रुटी व चुका निदर्शनास आणलेल्या आहेत. त्यामुळे मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ३३(१९) मध्ये उक्त तरतूदींच्या अर्थबोधाची स्पष्टता करुन सुसंगती आणणे आणि त्याकरीता शुध्दीपत्रक निर्गमित करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि त्याअर्थी, मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ३३(१९) मधील उपविनियम (५) खालील परंतुकामधील आणि सदर विनियमातील तक्त्याखालील टिप यामधील त्रुटी व चुक दुरुस्ती करण्यासाठी सोबतचे परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

उक्त शुध्दीपत्रकाची प्रत नागरिकांचे अवलोकनार्थ तीस दिवसांचे कालावधीपर्यंत खालील कार्यालयांमध्ये कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध राहील :-

१) प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई- ४००००१.

२) उप संचालक, नगररचना, बृहन्मुंबई , इन्सा हटमेंट्स, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई- ४००००१.

सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.Maharashtra.gov.in (कायदे व नियम) या वेबसाईटवर देखील उपलब्ध करण्यात आले आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**( निर्मलकुमार चौधरी )**
**अवर सचिव महाराष्ट्र शासन**

# परिशिष्ट

**नगर विकास विभाग शुध्दीपत्रक क्र. टिपीबी ४३१९/२२०/ प्र.क्र.-१४०/२०१९/नवि-११, दि. २४ सप्टेंबर, २०२० सोबतचे परिशिष्ट.**

## शुध्दीपत्रक

| Sr. No. | Regulation | Instead of | Read |
|---|---|---|---|
| 1 | Regulation 33(19) proviso below sub Regulation (5) | Designation | Existing amenity |
| 2 | Note below Table in Regulation 33(19) | **Note** : On the plot area excluding area to be handed over to MCGM/Appropriate Authority in lieu of Reservation/ Existing amenity in the DP/ proposed DP roads/prescribed RL under MMC Act and Parking Reservation. | **Note** : On the plot area excluding area to be handed over to MCGM/Appropriate Authority in lieu of Reservation/ Existing amenity in the DP **except affected by** proposed DP roads/sanctioned RL under MMC Act and Parking Reservation. |

URBAN DEVELOPMENT DEPTT MANTRALAYA MUMBAI-32

( निर्मलकुमार चौधरी )
**अवर सचिव महाराष्ट्र शासन**